# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे : संजीव चव्हाण

## बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये कार्यशाळा संपन्न

पाटण, दि. १९ : नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे आहे. नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात सखोल भर पडू शकते. पारंपरिक शिक्षण पद्धतीपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रम व्यापक आहेत. त्यामुळे विद्यार्थी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. आपण जे शिकतो त्याचा उपयोग आपल्याला आयुष्यात करता आला पाहिजे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी. डी. कॉलेज, पाटणमध्ये सुधारित अभ्यासक्रमावरील कार्यशाळा पार पडली. याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी विषयतज्ञ डॉ. के. डी. कुच्चे, प्रो. डॉ. एम. टी. गोफणे, प्रो. डॉ. एम. ए. पाटील, डॉ. डी. आर. फडतरे, डॉ. एस. एस. तडाखे, डॉ. एच. व्ही. काटे यांची उपस्थिती होती.



मार्गदर्शन करताना संजीव चव्हाण, व्यासपीठावर डॉ. एस. डी. पवार, डॉ. के. डी. कुच्चे, प्रो. डॉ. एम. टी. गोफणे आदी.

डॉ. एस. डी. पवार म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात जे बदल झाले आहेत, ते स्वीकारावे लागतील. प्रत्येक विषयाचे वेगळे महत्त्व आहे. त्याचा अभ्यास सर्वांगाने होणे आवश्यक आहे. आंतरविद्याशाखीय संबंधामुळे नवीन ज्ञान शाखा निर्माण होत आहेत त्याचाही विचार केला जावा, असे त्यांनी सांगितले.

द्वितीय सत्रात विषयतज्ञ प्रो. डॉ. व्ही. आर. वीर, डॉ. पी. आर. जाधव, प्रो. डॉ. आर. एस. शिखलगार यांनी भूगोलशास्त्रातील पर्यावरणशास्त्र आणि नकाशा शास्त्रातील प्रात्यक्षिक या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. संदीप तडाखे यांनी आभार मानले. डॉ. एस. एस. पवार यांनी सूत्रसंचालन केले. गणितशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. आर. फडतरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. संतोष पाटील, प्रा. गंगाराम चव्हाण यांनी प्रयत्न केले. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील १७५ प्राध्यापक उपस्थित होते.